# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १६.०८.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) जरीपटका पोलीसांची कामगिरी :– जिवे ठार मारणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १३.०८.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, एनआयटी गार्डन जवळील गल्ली, कुशीनगर येथे फिर्यादीचा मुलगा नामे राजविर सोहनकुमार शर्मा वय १८ वर्ष रा. प्लॉट क्र. ५९, कुशीनगर, नागपूर यास आरोपी क्र. १) राज ईलमकर, वय २२ वर्ष २) रोहीत ईलमकर, वय २० वर्ष, दोन्ही रा. एनआयटी गार्डन जवळ, कुशीनगर, जरीपटका ३) हनी डोगरे वय २५ वर्ष रा. कुशीनगर, जरीपटका, नागपूर यांनी संगनमत करुन, जुने भांडणाचे कारणावरुन फिर्यादीचे मुलास शस्त्राने वार करुन गंभीर जखमी केले. तसेच त्याचा मित्र नामे नयन सोनबरसे हा मध्ये वाचविण्यास गेला असता, त्यालाही जिवे ठार मारण्याचे उद्येशाने शस्त्राने वार करुन जखमी केले. जखमी यांना उपचाराकरीता, विम्स् हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलास तपासुन मृत घोषित केले होते. जखमी नयन याचा उपचार सुरु आहे. याप्रकरणी फिर्यादी सौ. शालु सोहनकुमार शर्मा, वय ४० वर्षे, रा. प्लॉट क्र. ५९, कुशीनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे आरोपींविरुध्द कलम १०३(१), १०९(१), ११५(२), ३५१(३), ३५२, ३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान जरीपटका पोलीसांनी तांत्रीक तपास करून व विश्वसनिय गोपनिय माहीतीवरून आरोपी हे जबलपुर येथे असल्याचे निष्पन्न केले. तपास पथकाचे सपोनि. जितेंद्र ठाकुर व त्यांचे पथकाने जबलपुर येथे जावुन, तेथुन दिनांक १५.०८.२०२६ रोजी आरोपी क्र. १) राज प्रभु ईलमकर, वय २४ वर्षे, २) रोहीत प्रभु ईलमकर, वय २१ वर्षे, दोन्हीही रा. प्लॉट नं. ८४३, कुशी नगर, जरीपटका, ३) हनी उर्फ हर्षीत बैजु डोंगरे, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ८३४, कुशीनगर, जरीपटका, नागपुर यांना ताब्यात घेतले. आरोपींना अटक करून, आरोपींची मा. न्यायालयातुन पोलीस कोठडी प्राप्त केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपुर शहर मा. श्री. डॉ. संदीप पखाले पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, सपोनि. जितेंद्र ठाकुर व त्यांचे तपास पथकाने केली.



**२) हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०८.२०२६ चे १३.५० वा. ते १४.५५ वा. चे दरम्यान, हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत बेसा पावर हाऊस चौक, म्हाळगी नगर येथील गजानन अपार्टमेंटचे मोकळ्या पॅसेजमध्ये काही इसम ताशपत्त्यांवर पैशांची बाजी लावून हार—जीतचा जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) रोशन प्रकाश भोजणे, वय ३५ वर्षे, रा. प्लॉट नं. १००८, आशिर्वाद नगर, सक्करदरा २) रितेश प्रेमचंद गुप्ता, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. १२, संत गजानन नगर, हुडकेश्वर ३) रोहीत वसंतराव बिजागरे, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. २३२, आशिर्वाद नगर, सक्करदरा ४) सुरज मोरश्वर बारापात्रे, वय ३२ वर्षे, रा. सुदर्शन नगर, न्यु नरसाळा रोड, हुडकेश्वर ५) मंगेश प्रल्हाद वानखेडे, वय ३६ वर्षे, रा. प्लॉट नं. ७०, म्हाळगी नगर, बेसा पॉवर हाऊसमागे, हुडकेश्वर ६) आशिष भिमराव वानखेडे, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. २४०, म्हाळगी नगर, हुडकेश्वर ७) मयुर अशोकराव शेळके, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट नं. ४४२, आशिर्वाद नगर, सक्करदरा हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन डावावरील रोख ४,५००/— रु., ५२ ताश पत्ते, ०७ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल, ०३ दुचाकी वाहने व इतर साहित्य असा एकुण २,०७,२००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, मवपोनि. अनामिका मिर्झापुरे, सपोनि. पपीन रामटेके, पोहवा. बजरंग जुनघरे, अविनाश श्रीरामे, मुकेश कन्हाके, पोअं. गौरव गजभिये व ऋषभ ठाकरे यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे कपीलनगर :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १५.०७.२०२६ चे २३.१० वा. चे सुमारास, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, अंगात लाल रंगाचे शर्ट घातलेला इसम म्हाडा क्वॉर्टर, ब्लॉक नं. ७० जवळ शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम आपले हातातील शस्त्र जमीनीवर फेकुन पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रविण अशोक ठाणेकर, वय ३० वर्षे, रा. क्वार्टर नं. १११५, नारी रोड, कपीलनगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन जमीनीवर फेकलेला लोखंडी कोयता किंमती ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता बाळगताना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. मुकेश हलमारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे जरीपटका :—** दिनांक १५.०८.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत जमना पॅलेस अपार्टमेंट, दयानंद पार्क जवळ, जरीपटका, नागपुर येथे सुरज प्रकाश सुरजेकर, वय २६ वर्षे, रा. भांडेवाडी, अंतुजी नगर, नागपुर हे व त्यांचे भाऊ क्रेनने बांधकाम साहीत्य तसेच विटा १० वे माळ्यावर चढविण्याचे काम करीत असतांना अचानक त्यांचा तोल जावुन, ते १० व्या माळ्यावरून जमिनीवर खाली

पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांचे सोबत काम करणारे त्यांचे भावाने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. अक्षय ठाकरे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**